# प्रकरण सहावे

## आर्थिक तथ्य संकलनाचे परिक्षण/विश्लेषण

६. प्रस्तावना

६.१ बालक व बालिका कामगारांचे कुटूंबातील सदस्य संख्येचे विश्लेषण (सहसंबंध)

६.२ बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध)

६.३ बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध)

६.४ बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध)

६.५ बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.६ बालक व बालिका कामगारांच्या मातांच्या कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.७ बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीच्या कामाच्या कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.८ बालक व बालिका कामगारांच्या वडीलांना मिळणाऱ्या मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.९ बालक व बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१० बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.११ बालक व बालिका बालकामगारांचे कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१२ बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१३ बालक व बालिका कामगारांना दररोज मिळणाऱ्या वेतनाचे प्रमाणाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१४ बालक व बालिका कामगारांना अधिक काम केल्यामुळे मिळणारे वेतनाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१५ बालक व बालिका बालकामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१६ बालक व बालिका कामगारांचे स्वत:वरचे खर्चाचे विश्लेषण (सहसंबंध)

६.१७ बालक व बालिका बालकामगार बचत करतात किंवा नाही याबाबत विश्लेषण (सहसंबंध)

६.१८ बालक व बालिका कामगार किती बचत करतात याचे विश्लेषण (सहसंबंध)

# प्रकरण सहावे
# आर्थिक तथ्य संकलनाचे परिक्षण/विश्लेषण

## ६. प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी गोळा केलेले तथ्याचे परिक्षण/विश्लेषण केले आहे. प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची आर्थिक समस्यांचा, बालकामगारांच्या पुनर्वसनाचा शोध घेऊन त्यामध्ये बालक व बालिका कामगारांचे सहसंबंधाचे परिक्षण/विश्लेषण करण्यात आले आहे. बालकामगारांची आर्थिक समस्या, बालकामगारांचे पुनर्वसन अभ्यासताना प्रामुख्याने अनुसूचीद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून व मिळालेल्या प्राथमिक माहितीतून सोलापूरातील बालकामगारांमध्ये बालक व बालिका कामगारांचे सहसंबंधाचे परिक्षण करुन समस्या व पुनर्वसनाची मांडणी केली आहे. सोलापूरातील एकूण २६० बालकामगारांची अभ्यासासाठी निवड केली आहे. या २६० बालकामगारांमध्ये सोलापूर शहरातील बालकामगार बहूलता क्षेत्रातील १३० बालकामगार व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील विशेष शाळेतील शैक्षणिक पुनर्वसनातील १३० बालकामगार असे एकूण २६० बालकामगारांची निवड करण्यात आली आहे. या २६० बालकामगारांमध्ये बालक व बालिका कामगारांच्या सहसंबंधाचे परिक्षण/विश्लेषण अभ्यासावरुन निघालेले निष्कर्ष संपूर्ण सोलापूर जिल्हयासाठी लागू केले आहेत. एकूणच प्रस्तूत प्रकरणात अतिशय सुक्ष्मरित्या सोलापूरातील बालकामगारांची आर्थिक, समस्या, व त्यांचे पुनर्वसनाची स्थिती स्पष्ट केली आहे.

## ६.१ बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कुटूंबातील सदस्यांची संख्येचे विश्लेषण (सहसंबंध)

साधारणत: कुटूंबाच्या सदस्य संख्येवरुन कुटूंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती स्पष्ट होते. कुटूंबाचा आकार त्यांच्या मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम करीत असतो. कुटूंबाचा आकार मोठा असल्यास दारिद्र्य वाढण्याची व बालकामगार निर्मितीची शक्यता असते. म्हणूनच प्रस्तूत अध्ययनात बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबाच्या सदस्य संख्येचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ६.१ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्यचे विश्लेषण (सहसंबंध) स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ६.१

## बालक व बालिका कामगारांचे कुटूंबातील सदस्य संख्येचे विश्लेषण

**Relationship between No. of Family Member and Gender of Child Labour**

| कुटूंब सदस्य संख्या | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| ३ | उत्तरदात्यांची संख्या | ३ | २ | ५ |
| | टक्केवारी | १.२% | ०.८% | १.९% |
| ४ | उत्तरदात्यांची संख्या | १३ | २१ | ३४ |
| | टक्केवारी | ५.०% | ८.१% | १३.१% |
| ५ | उत्तरदात्यांची संख्या | २३ | ४२ | ६५ |
| | टक्केवारी | ८.८% | १६.२% | २५.०% |
| ६ | उत्तरदात्यांची संख्या | २३ | २९ | ५२ |
| | टक्केवारी | ८.८% | ११.२% | २०.०% |
| ७ | उत्तरदात्यांची संख्या | १६ | २२ | ३८ |
| | टक्केवारी | ६.२% | ८.५% | १४.६% |
| ८ | उत्तरदात्यांची संख्या | १९ | १० | २९ |
| | टक्केवारी | ७.३% | ३.८% | ११.२% |
| ९ | उत्तरदात्यांची संख्या | ८ | ४ | १२ |
| | टक्केवारी | ३.१% | १.५% | ४.६% |
| १० | उत्तरदात्यांची संख्या | ६ | ६ | १२ |
| | टक्केवारी | २.३% | २.३% | ४.६% |
| ११ | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.०% | ०.४% |
| १२ | उत्तरदात्यांची संख्या | ६ | ३ | ९ |
| | टक्केवारी | २.३% | १.२% | ३.५% |
| १८ | उत्तरदात्यांची संख्या | २ | १ | ३ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.४% | १.२% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **एकूण** | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कुटूंबातील सदस्य संख्येबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.१**

**बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कुटूंबातील सदस्य संख्येबाबतचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.१ मध्ये बालक व बालिका कामगारांचे त्यांच्या कुटूंबातील सदस्यांची संख्येचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये कुटूंब सदस्य संख्या ३ असलेले एकूण १.९% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ३ असलेले १.२% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ३ असलेले मुले ०.८% बालकामगार आहेत. कुटूंब सदस्य संख्या ४ असलेले एकूण १३.१% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ४ असलेले ५.०% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ४ असलेले ८.१% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ४ असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या ५

असलेले एकूण २५.५% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ५ असलेले ८.८% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ५ असलेले  १६.२% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ५ असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या ६ असलेले एकूण २०.०% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ६ असलेले ८.८% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ५ असलेले  ११.२% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ६ असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या ७ असलेले एकूण १४.६% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ५ असलेले ६.२% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ७ असलेले  ८.५% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ७ असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या ८ असलेले एकूण ११.२% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ८ असलेले ७.३% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ८ असलेले  ३.८% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ८ असलेले मुलांच्या प्रमाणात मुलींचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या ९ असलेले एकूण ४.६% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ९ असलेले ३.१% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ९ असलेले  १.५% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ९ असलेले मुलांच्या प्रमाणात मुलींचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या १० असलेले एकूण ४.६% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या १० असलेले २.३% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या १० असलेले  २.३% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या १० असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण समान आहे. कुटूंब संख्या ११ असलेले एकूण ०.४% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या ११ असलेले ०.४% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या ११ असलेले एकही बालकामगार नाही. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या ११ असलेले मुलीचे प्रमाण जास्त आहे. कुटूंब संख्या १२ असलेले एकूण ३.५% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या १२ असलेले २.३% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या १२ असलेले  १.

२% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या १२ असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण कमी आहे. कुटूंब संख्या १८ असलेले एकूण १.२% बालकामगार आहेत. यामध्ये मुलीच्या कुटूंबातील सदस्य संख्या १८ असलेले ०.८% बालकामगार आहेत तर मुलांच्या कुटूंबात सदस्य संख्या १८ असलेले ०.४% बालकामगार आहेत. म्हणजे कुटूंबातील सदस्य संख्या १८ असलेले मुलीच्या प्रमाणात मुलांचे प्रमाण कमी आहे.

## ६.२ बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) :

निवडलेल्या बालकामगारांपैकी जवळपास ९२ टक्के बालकामगारांचे वडील काम करत असूनही तेथे बालकांना काम करावे लागत आहे ही विचार करण्याची बाब आहे. त्यामुळे प्रस्तूत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी किती बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात आणि काम करीत नाही हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ६.२ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरणाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६.२**

**बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण**

**Relationship between employment of child labours father and Gender of Child Labour**

| वडील काम करतात किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| वडील काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ८८ | १०१ | १८९ |
| | टक्केवारी | ४३.१% | ४९.५% | ९२.६% |
| वडील काम करत नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | ८ | ७ | १५ |
| | टक्केवारी | ३.९% | ३.४% | ७.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ९६ | १०८ | २०४ |
| | टक्केवारी | ४७.१% | ५२.९% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ६.२

**बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.२ मध्ये बालक व बालिका कामगारांचे वडील काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ४७.१% आहे तर मुलांचे प्रमाण ५२.९% आहे. एकूण ४३.१% बालिका कामगारांचे वडील काम करतात तर ४९.५% बालक कामगारांचे वडील काम करतात. बालिका कामगारांच्या वडीलांचे काम करण्याचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे वडीलांचे काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. आणि ३.९% बालिका कामगारांचे वडील काम करत नाहीत तर ३.४% बालक कामगारांचे वडील काम करत नाही. बालिका कामगारांच्या वडील काम करत नसल्याचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे वडीलांचे काम करत नसल्याचे प्रमाण कमी आहे. याचा अर्थ असा की, बालिका कामगारांना घरात आर्थिक मदत करण्यासाठी काम करावे लागत आहे.

## ६.३ बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) :

निवडलेल्या बालकामगारांपैकी जवळपास ९८ टक्के बालकामगारांचे मातासुद्धा काम करत असूनही तेथे बालकांना काम करावे लागत आहे ही खेदाची गोष्ट आहे. त्यामुळे प्रस्तूत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी किती बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात आणि काम करीत नाही हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ६.३ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे कामाचे विवरणाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६.३**

**बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात किंवा नाही याबाबत विश्लेषण**

**Relationship between employment of child labours mother and Gender of Child Labour**

| माता काम करतात किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| माता काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ११२ | १३३ | २४५ |
| | टक्केवारी | ४४.८% | ५३.२% | ९८.०% |
| माता काम करत नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | १ | ४ | ५ |
| | टक्केवारी | ०.४% | १.६% | २.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ११३ | १३७ | २५० |
| | टक्केवारी | ४५.२% | ५४.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ६.३

### बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ६.३ मध्ये बालक व बालिका कामगारांचे माता काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ४५.२% आहे तर मुलांचे प्रमाण ५४.८% आहे. एकूण ४४.८% बालिका कामगारांचे माता काम करतात तर ५३.२% बालक कामगारांचे माता काम करतात. बालिका कामगारांच्या मातांचे काम करण्याचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे मातांचे काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. आणि ०.४% बालिका कामगारांचे माता काम करत नाहीत तर १.६% बालक कामगारांचे माता काम करत नाही. बालिका कामगारांच्या माता काम करत नसल्याचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे माता काम करत नसल्याचे प्रमाण जास्त आहे.

## ६.४ बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही याबाबतचे

### विश्लेषण (सहसंबंध) :

निवडलेल्या बालकामगारांपैकी जवळपास ९०–९८ टक्के बालकामगारांचे आईवडील काम करत असूनही तेथे इतर व्यक्तींनाही काम करावे लागते यामध्ये बालकांचाही समावेश आहे. त्यामुळे प्रस्तूत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी किती बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र.

६.४ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे विवरणाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ६.४

### बालक व बालिका कामगारांचे कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही याबाबत विश्लेषण

**Relationship between employment of other family member and Gender of Child Labour**

| इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बलिका | बालक | |
| इतर व्यक्ती काम करतात | उत्तरदात्यांची संख्या | ४४ | ३० | ७४ |
| | टक्केवारी | ५९.५% | ४०.५% | १००.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ४४ | ३० | ७४ |
| | टक्केवारी | ५९.५% | ४०.५% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ६.४
### बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध



वरील तक्ता क्र. ६.४ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये मुलींचे प्रमाण ५९.५% आहे तर मुलांचे प्रमाण ४०.५% आहे. एकूण ५९.५% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात तर ४०.५% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात. याचा अर्थ बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे काम करण्याचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे काम करण्याचे प्रमाण कमी आहे. यावरुन हे लक्षात येते की, बालिका कामगारांच्या घरातील परिस्थिती अत्यंत बिकट आहे. बिकट परिस्थितीमुळे घरातील सर्व सदस्यांना काम करावे लागत आहे.

## ६.५ बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालकामगारांचे आईवडील कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहणे देखिल महत्वाचे आहे. कारण त्यांच्या कामाचा दर्जा जर चांगला असेल तर बालकांना काम करावे लागत नाही. निवडलेल्या जवळपास सर्व बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे असे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ६.५ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ६.५

### बालक व बालिका कामगारांचे वडीलांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण

**Relationship between Nature of Father Work and Gender of Child Labour**

| वडीलांचे कामाचे स्वरुप | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| बिगारी | उत्तरदात्यांची संख्या | २० | २६ | ४६ |
| | टक्केवारी | १०.६% | १३.८% | २४.३% |
| मजूरी | उत्तरदात्यांची संख्या | ११ | १९ | ३० |
| | टक्केवारी | ५.८% | १०.१% | १५.९% |
| कचरा वेचणे | उत्तरदात्यांची संख्या | ४ | ७ | ११ |
| | टक्केवारी | २.१% | ३.७% | ५.८% |
| हॉटेल | उत्तरदात्यांची संख्या | ७ | ८ | १५ |
| | टक्केवारी | ३.७% | ४.२% | ७.९% |
| हमाल | उत्तरदात्यांची संख्या | २ | ३ | ५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | १.१% | १.६% | २.६% |
| ड्रायव्हर | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.०% | ०.५% |
| बिडी बनविणे | उत्तरदात्यांची संख्या | ३ | १ | ४ |
| | टक्केवारी | १.६% | ०.५% | २.१% |
| वॉचमन | उत्तरदात्यांची संख्या | ३ | २ | ५ |
| | टक्केवारी | १.६% | १.१% | २.६% |
| नोकरी | उत्तरदात्यांची संख्या | ६ | ३ | ९ |
| | टक्केवारी | ३.२% | १.६% | ४.८% |
| वस्तु विकणे | उत्तरदात्यांची संख्या | ५ | ५ | १० |
| | टक्केवारी | २.६% | २.६% | ५.३% |
| विटभट्टीत काम | उत्तरदात्यांची संख्या | २ | ३ | ५ |
| | टक्केवारी | १.१% | १.६% | २.६% |
| शेती | उत्तरदात्यांची संख्या | १ | २ | ३ |
| | टक्केवारी | ०.५% | १.१% | १.६% |
| सुतार | उत्तरदात्यांची संख्या | १४ | १६ | ३० |
| | टक्केवारी | ७.४% | ८.५% | १५.९% |
| कारखाना | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.५% | १.१% |
| झाडू मारतात | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.०% | ०.५% |
| दुध डेअरी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.०% | ०.५% |
| पिठाची गिरणी | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.५% | १.१% |
| पेंटर | उत्तरदात्यांची संख्या | ५ | ४ | ९ |
| | टक्केवारी | २.६% | २.१% | ४.८% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ८८ | १०१ | १८९ |
| | टक्केवारी | ४६.६% | ५३.४% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ६.५

### बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ६.५ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगार प्रमाण ४६.६% आहेत तर बालक कामगाराचे प्रमाण ५३.४% आहे. १०.६% बालिका कामगारांचे वडील बिगारी म्हणून काम करतात तर १३.८% बालक कामगारांचे वडील बिगारी म्हणून काम करतात. ५.८% बालिका कामगारांचे वडील मजूरी करतात तर १०.१% बालक कामगारांचे वडील बिगारी म्हणून काम करतात. २.१% बालिका कामगारांचे वडील कचरा वेचण्याचे काम करतात तर ३.७% बालक कामगारांचे वडील कचरा वेचण्याचे काम करतात. ३.७% बालिका कामगारांचे वडील हॉटेल मध्ये काम करतात तर ४.२% बालक कामगारांचे वडील हॉटेलमध्ये काम करतात. ०.५% बालिका कामगारांचे वडील ड्रायव्हर म्हणून काम करतात तर बालक कामगारांचे वडील ड्रायव्हरचे काम करत नाहीत. १.६% बालिका कामगारांचे वडील बिडया बनविण्याचे काम करतात ०.५% बालक कामगारांचे वडील बिडया बनविण्याचे काम करतात. १.६% बालिका कामगारांचे वडील वॉचमन म्हणून काम करतात तर १.१% बालकामगारांचे वडील वॉचमन म्हणून काम करतात. ३.२% बालिका कामगारांचे वडील नोकरी करतात तर १.

६% बालक कामगारांचे वडील नोकरी करतात. २.६% बालिक व बालिका कामगारांचे वडील वेगवेगळे वस्तु विकण्याचे काम करतात. १.१% बालिका कामगारांचे वडील विटभट्टीत काम करतात तर १.६% बालक कामगारांचे वडील विटभट्टीत काम करतात. ०.५% बालिका कामगारांचे वडील शेती करतात तर १.१% बालक कामगारांचे वडील शेती करतात. ७.४% बालिका कामगारांचे वडील सुतार म्हणून काम करतात तर ८.५% बालक कामगारांचे वडील सुतार म्हणून काम करतात. ०.५% बालक व बालिका कामगारांचे वडील कारखान्यात काम करतात. ०.५% बालिका कामगारांचे वडील झाडू मारण्याचे काम करतात तर बालक कामगारांचे वडील झाडू मारण्याचे काम करत नाहीत. ०.५% बालिका कामगारांचे वडील दुध डेअरी मध्ये काम करतात तर बालक कामगारांचे वडील दुध डेअरीत काम करत नाहीत. ०.५% बालक व बालिका कामगारांचे वडील पिठाच्या गिरणीत काम करतात. २.६% बालिका कामगारांचे वडील पेंटर म्हणून काम करतात तर २.१% बालक कामगारांचे वडील पेंटर म्हणून काम करतात. यावरुन हे लक्षात येते की बालक व बालिका कामगारांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे. वडीलांचे काम निम्न दर्जाचे असल्याने त्यांना मिळणारे उत्पन्नही कमी आहे. बालक व बालिका कामगारांचे वडीलांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे असल्यामुळे त्यांना मिळणारे वेतनही निम्न दर्जाचे आहे. परिणामी घरातील उत्पन्न कमी असल्याने बालक व बालिकांना काम करावे लागत आहे. म्हणजेच कुटूंबातील सदस्याचा कामाचा निम्न दर्जा, दारिद्रय, गरीबी बालकामगार निर्माण होण्यास कारणीभूत आहे हे सिद्ध झाले आहे.

### ६.६ बालक व बालिका कामगारांच्या मातांच्या कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालकामगारांचे आईवडील कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहणे देखिल महत्वाचे आहे. कारण त्यांच्या कामाचा दर्जा जर चांगला असेल तर बालकांना काम करावे लागत नाही. निवडलेल्या जवळपास सर्व बालक व बालिका कामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे असे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ६.६ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ६.६

## बालक व बालिका कामगारांचे मातांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण

**Relationship between Nature of Mother Work and Gender of Child Labour**

| | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| बिगारी | उत्तरदात्यांची संख्या | ० | २ | २ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.८% | ०.८% |
| घरकाम | उत्तरदात्यांची संख्या | ४२ | ६० | १०२ |
| | टक्केवारी | १७.१% | २४.५% | ४१.६% |
| मजूरी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ३ | ४ |
| | टक्केवारी | ०.४% | १.२% | १.६% |
| कचरा वेचणे | उत्तरदात्यांची संख्या | ६ | १३ | १९ |
| | टक्केवारी | २.४% | ५.३% | ७.८% |
| हॉटेल | उत्तरदात्यांची संख्या | १ | २ | ३ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.८% | १.२% |
| हमाल | उत्तरदात्यांची संख्या | १ | २ | ३ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.८% | १.२% |
| बिडया बनविणे | उत्तरदात्यांची संख्या | ४६ | ३९ | ८५ |
| | टक्केवारी | १८.८% | १५.९% | ३४.७% |
| वस्तु विकणे | उत्तरदात्यांची संख्या | २ | ३ | ५ |
| | टक्केवारी | ०.८% | १.२% | २.०% |
| विटभट्टीत काम | उत्तरदात्यांची संख्या | २ | २ | ४ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.८% | १.६% |
| आया | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.४% | ०.८% |
| शेती | उत्तरदात्यांची संख्या | २ | २ | ४ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.८% | १.६% |
| कारखाना | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.०% | ०.४% |
| झाडू मारतात | उत्तरदात्यांची संख्या | २ | ० | २ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.०% | ०.८% |
| रेल्वेत डबे देतात | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.४% | ०.४% |
| दुध डेअरी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.०% | ०.४% |
| पेंटर | उत्तरदात्यांची संख्या | ० | २ | २ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.८% | ०.८% |
| कपडे शिवणे | उत्तरदात्यांची संख्या | ४ | १ | ५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | १.६% | ०.४% | २.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ११२ | १३३ | २४५ |
| | टक्केवारी | ४५.७% | ५४.३% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.६**

**बालक व बालिका कामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.६ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४५.७% तर बालक कामगारांचे प्रमाण ५४.३% इतके आहे. ०.८% बालक कामगारांचे माता बिगारी म्हणून काम करतात तर बालिका कामगारांचे माता बिगारी म्हणून काम करत नाहीत. १७.१% बालिका कामगारांचे माता घरकाम करतात तर २४.५% बालक कामगारांचे माता घरकाम म्हणून काम करतात. ०.४% बालिका कामगारांचे माता मजूरी करतात तर १.२% बालक कामगारांचे माता मजूरी करतात. २.४% बालिका कामगारांचे माता कचरा वेचण्याचे काम करतात तर ५.३% बालक कामगारांचे माता कचरा वेचण्याचे काम करतात. ०.४%

बालिका कामगारांच्या माता हॉटेल मध्ये काम करतात तर ०.८% बालक कामगारांचे माता हॉटेल मध्ये काम करतात. ०.४% बालिका कामगारांचे माता हमाल म्हणून काम करतात तर ०.८% बालक कामगारांच्या माता हॉटेलमध्ये काम करतात. १८.८% बालिका कामगारांचे माता बिडया बनविण्याचे काम करतात तर १५.९% बालक कामगारांच्या माता बिडया बनविण्याचे काम करतात. ०.८% बालिका कामगारांच्या माता वस्तू विकण्याचे काम करतात तर १.२%बालक कामगारांचे माता वस्तू विकण्याचे काम करतात. ०.८% बालक व बालिका कामगारांचे माता विटभट्टीत काम करतात. ०.४% बालक व बालिका कामगारांच्या माता आया म्हणून काम करतात. ०.८% बालक व बालिका कामगारांच्या माता शेती करतात. ०.४% बालिका कामगारांच्या माता कारखान्यात काम करतात तर बालक कामगारांच्या माता कारखान्यात काम करत नाहीत. ०.८% बालिका कामगारांचे माता झाडू मारण्याचे काम करतात तर बालक कामगारांच्या माता झाडू मारण्याचे काम करता नाहीत. ०.४% बालक कामगारांच्या माता रेल्वे स्टेशनवर डबे देण्याचे काम करतात तर बालिका कामगारांचे माता हे काम करत नाहीत. ०.४% बालिका कामगारांच्या माता दुध डेअरी मध्ये काम करतात तर बालक कामगारांच्या माता दुध डेअरीत काम करत नाहीत. ०.८% बालक कामगारांच्या माता पेंटर म्हणून काम करतात तर बालिका कामगारांच्या माता पेंटर म्हणून काम करत नाहीत. १.६% बालिका कामगारांचे माता कपडे शिवण्याचे काम करतात तर ०.४% बालक कामगारांच्या माता कपडे शिवण्याचे काम करतात. यावरुन हे लक्षात येते की, बालक व बालिका कामगारांच्या माताचे कामाचे स्वरुपही निम्न दर्जाचे आहे. मातांच्या कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे असल्याने त्यांना मिळणारे वेतनही कमी आहे. त्यामुळे बालकामगारांनाही आर्थिक मदत करण्यासाठी काम करावे लागते. मातांच्या कामाच्या दर्जावरुन असे लक्षात येते बालक व बालिका कामगारांचे कामाचे स्वरुपही निम्न दर्जाचे आहे. आपले आईवडील कशा पद्धतीचे काम करतात त्याचा परिणाम मुलांमुलींवरही होत असतो. वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते निवडलेल्या सर्व बालक व बालिका कामगारांच्या आईवडीलांच्या कामाच्या स्वरुपाचे बालकामगारांवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. बालक व बालिका कामगारही आर्थिक मदत करण्यासाठी आईवडीलांसारख्या निम्न दर्जाचे काम करत आहेत. कुटूंबातील बिकट परिस्थिती, दारिद्रय,

गरीबी, कुटूंबाचे निम्न दर्जाचे काम बालकामगार निर्माण होण्यास कारणीभूत आहेत असे सिद्ध झाले आहे.

## ६.७ बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीच्या कामाच्या कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगारांचे कुटूंबातील इतर व्यक्ती कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहणे महत्वाचे आहे. कारण त्यांच्या कामाचा दर्जा जर चांगला असेल तर बालकांना काम करावे लागत नाही. निवडलेल्या जवळपास सर्व बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे असे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ६.७ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुपाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ६.७

### बालक व बालिका कामगारांचे कुटूंबातील इतर व्यक्तींचे कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण

**Relationship between Nature of Other Family Member Work and Gender of Child Labour**

| बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे कामाचे स्वरुप | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| बिगारी | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | १.४% | १.४% | २.७% |
| घरकाम | उत्तरदात्यांची संख्या | २० | ६ | २६ |
| | टक्केवारी | २७.०% | ८.१% | ३५.१% |
| मजूरी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | १.४% | ०.०% | १.४% |
| कचरा वेचणे | उत्तरदात्यांची संख्या | ४ | ५ | ९ |
| | टक्केवारी | ५.४% | ६.८% | १२.२% |
| हॉटेल | उत्तरदात्यांची संख्या | १ | ६ | ७ |
| | टक्केवारी | १.४% | ८.१% | ९.५% |
| बिडया बनविणे | उत्तरदात्यांची संख्या | १५ | १० | २५ |
| | टक्केवारी | २०.३% | १३.५% | ३३.८% |
| विटभट्टी | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | १.४% | ०.०% | १.४% |
| शेती | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | १.४% | १.४% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पेंटर | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | १.४% | १.४% |
| कपडे शिवणे | उत्तरदात्यांची संख्या | १ | ० | १ |
| | टक्केवारी | १.४% | ०.०% | १.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ४४ | ३० | ७४ |
| | टक्केवारी | ५९.५% | ४०.५% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या कामाच्या स्वरुपाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.७**

**बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या कामाचे स्वरुपाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.७ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीच्या कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ५९.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४०.५% आहे. १.४% बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती म्हणून काम करतात. बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे प्रमाण समान आहे. २७.०% बालिका

कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती घरकाम करतात तर ८.१% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती घरकाम करतात. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे जास्त प्रमाण आहे तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे प्रमाण कमी आहे. १.४% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती मजूरी करतात तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती मजूरी करत नाहीत. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मजूरी करण्याचे प्रमाण जास्त आहे. ५.४% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती कचरा वेचण्याचे काम करतात तर ६.८% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती कचरा वेचण्याचे काम करतात. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे कचरा वेचण्याच्या कामाचे प्रमाण कमी आहे आहे तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे कचरा वेचण्याचे कामाचे प्रमाण जास्त आहे. १.४% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती हॉटेलमध्ये काम करतात तर ८.१% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती हॉटेलमध्ये काम करतात. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे हॉटेलमध्ये काम करण्याचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे हॉटेलमध्ये काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. २०.३% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती बिडया बनविण्याचे काम करतात तर १३.५% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती बिडी बनविण्याचे काम करतात. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे बिडया बनविण्याचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे बिडया बनविण्याचे प्रमाण कमी आहे. १.४% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती विटभट्टीत काम करतात तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती विटभट्टीत काम करत नाहीत. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे विटभट्टीत काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती शेतीमध्ये काम करत नाहीत तर १.४% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती शेतीमध्ये काम करतात. बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे शेतीत काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती पेंटर म्हणून काम करत नाहीत तर १.४% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती पेंटर म्हणून काम करतात. बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे पेंटर म्हणून काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. १.४% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती कपडे शिवण्याचे काम

करतात तर बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती कपडे शिवण्याचे काम करत नाहीत. यावरुन असे लक्षात येते की, बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचेही कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे. वरील दोन तक्त्यांमध्ये बालकामगारांच्या आईवडीलांचे कामाचे स्वरुप पाहिले असता व सदरील तक्त्यामध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे कामाचे स्वरुप पाहता असे लक्षात येते की, बालकामगारांच्या कुटूंबातील सर्व सदस्यांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे. कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे असल्यामुळे त्यांना मिळणारे उत्पन्नही खूप कमी आहे. घरामध्ये सदस्य जास्त व दारिद्रय यामुळे बालकामगारांनाही काम करावे लागते.

### ६.८ बालक व बालिका कामगारांच्या वडीलांना मिळणाऱ्या मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तुत पाहणीमध्ये असे आढळून आले आहे बालक व बालिका कामगारांच्या वडीलांना मिळणारे उत्पन्न हे अतिशय निम्न आहे. पुढील तक्ता क्र. ६.८ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांच्या मासिक उत्पन्नाची पातळीचे सहसंबंध दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ६.८**

**बालक व बालिका कामगारांचे वडीलांची मासिक उत्पन्नाची पातळीचे विश्लेषण**

**Relationship between Fathers Monthly Income and Gender of Child Labour**

| वडीलांचे मासिक उत्पन्न | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| ५०० ते १००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ५ | ९ | १४ |
| | टक्केवारी | २.६% | ४.७% | ७.४% |
| १००१ ते २००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ४६ | ५० | ९६ |
| | टक्केवारी | २४.२% | २६.३% | ५०.५% |
| २००१ ते ३००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | २८ | ३४ | ६२ |
| | टक्केवारी | १४.७% | १७.९% | ३२.६% |
| ३००१ ते ४००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ८ | ५ | १३ |
| | टक्केवारी | ४.२% | २.६% | ६.८% |
| ४००१ ते ५००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | १ | ३ | ४ |
| | टक्केवारी | ०.५% | १.६% | २.१% |
| ५००१ ते ६००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.५% | ०.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ८८ | १०२ | १९० |
| | टक्केवारी | ४६.३% | ५३.७% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांना मिळणाऱ्या मासिक उत्पन्नाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.८**

**बालक व बालिका कामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्नाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.८ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या वडीलांना मिळणाऱ्या मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.३% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.७% आहे. २.६% बालिका कामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके आहे तर ४.७% बालक कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके आहे. २४.२% बालिका कामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे तर २६.३% बालक कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे. १४.७% बालिका कामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्न २००१ ते ३००० रु. इतके आहे तर १७.९% बालक कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न २००१ ते ३००० रु. इतके आहे. ४.२% बालिका

कामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्न ३००१ ते ४००० रु. इतके आहे तर २.६% बालक कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न ३००१ ते ४००० रु. इतके आहे. ०.५% बालिका कामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्न ४००१ ते ५००० रु. इतके आहे तर १.६% बालक कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न ४००१ ते ५००० रु. इतके आहे. ०.५% बालक कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न ५००१ ते ६००० रु. इतके आहे. यावरुन असे लक्षात येते की, बालक व बालिका कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न कमी आहे. १००१ ते २०००रु. इतके मासिक उत्पन्न मिळविणाऱ्या बालकामगारांच्या वडीलांची संख्या जवळपास ५०% हून जास्त आहे. तर ३००१ ते ६००० रु. इतके मासिक उत्पन्न मिळविणाऱ्या वडीलांची संख्या ९.४% इतकी कमी आहे. वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, एकंदरीत बालक व बालिका बालकामगारांच्या वडीलांचे मासिक उत्पन्न खूप कमी आहे. त्यामध्येही बालिका कामगारांच्या वडीलांचे प्रमाण कमी आहे. म्हणजे बालिका कामगारांची आर्थिक परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. तरीपरंतू बालक व बालिका कामगारांचे वडीलांचे मासिक उत्पन्न एकूणच खूप कमी आहे. उत्पन्न कमी व घरातील सदस्यांची संख्या जास्त त्याचबरोबर शिक्षण कमी किंवा अशिक्षितपणामुळे घरातील दारिद्रयात वाढ होत आहे. आणि दारिद्रयामुळे बालकामगारांना काम करावे लागत आहे.

## ६.९ बालक व बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तुत पाहणीमध्ये असे आढळून आले आहे बालक व बालिका कामगारांच्या मातांना मिळणारे उत्पन्न हे अतिशय निम्न आहे. पुढील तक्ता क्र. ६.९ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांची मासिक उत्पन्नाची पातळीचे सहसंबंध दर्शविले आहे.

### तक्ता क्र. ६.९

### बालक व बालिका कामगारांचे मातांचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण

**Relationship between Mothers Monthly Income and Gender of Child Labour**

| मातांचे मासिक उत्पन्न | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| ५०० ते १००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ४२ | ६३ | १०५ |
| | टक्केवारी | १७.१% | २५.७% | ४२.९% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १००१ ते २००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ६८ | ६७ | १३५ |
| | टक्केवारी | २७.८% | २७.३% | ५५.१% |
| २००१ ते ३००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | २ | ३ | ५ |
| | टक्केवारी | ०.८% | १.२% | २.०% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ११२ | १३३ | २४५ |
| | टक्केवारी | ४५.७% | ५४.३% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्नाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.९**

**बालक व बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्नाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.९ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४५.७% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५४.३% इतके आहे. १७.१% बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके आहे तर २५.७% बालक कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके आहे. २७.८% बालिका कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे तर २७.३% बालक कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे. ०.८% बालिका

कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न २००१ ते ३००० रु. इतके आहे तर १.२% बालक कामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न २००१ ते ३००० रु. इतके आहे. जवळपास निम्म्यापेक्षा कमी बालकामगारांच्या मातांचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके कमी आहे. जे खूप कमी आहे. आणि जवळपास निम्म्यापेक्षा जास्त बालकामगारांच्या मातांचे उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे. याचा अर्थ असा की, बालकामगारांच्या वडीलांसारखेच त्यांच्या मातांचेही उत्पन्न खूप कमी आहे. आईवडील दोघेही काम करुन आर्थिक परिस्थिती सुधारत नाही हे स्पष्ट होते. म्हणून आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीकोनातून बालकामगारांनाही काम करावे लागत आहे.

## ६.१० बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध):

प्रस्तुत पाहणीमध्ये असे आढळून आले आहे बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींना मिळणारे उत्पन्न हे अतिशय निम्न आहे. पुढील तक्ता क्र. ६.१० मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या मासिक उत्पन्नाची पातळीचे सहसंबंध दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ६.१०**

**बालक व बालिका कामगारांचे कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण**

**Relationship between Other Family Members Monthly Income and Gender of Child Labour**

| बालकामगाराच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे मासिक उत्पन्न | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| ५०० ते १००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | २१ | १५ | ३६ |
| | टक्केवारी | २८.४% | २०.३% | ४८.६% |
| १००१ ते २००० रु. | उत्तरदात्यांची संख्या | २३ | १४ | ३७ |
| | टक्केवारी | ३१.१% | १८.९% | ५०.०% |
| २००१ ते ३००० | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रु. | टक्केवारी | ०.०% | १.४% | १.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ४४ | ३० | ७४ |
| | टक्केवारी | ५९.५% | ४०.५% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्नाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.१०**

**बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्नाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.१० मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्नाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ५९.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४०.५% इतके आहे. २८.४% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके आहे तर २०.३% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके आहे. ३१.१% बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे तर १८.९% बालक कामगारांच्या मातांचे मासिक

उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे. १.४% बालक कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्न २००१ ते ३००० रु. इतके आहे. जवळपास निम्म्यापेक्षा कमी बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे मासिक उत्पन्न ५०० ते १००० रु. इतके कमी आहे. जे खूप कमी आहे. आणि जवळपास निम्म्या बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे उत्पन्न १००१ ते २००० रु. इतके आहे. याचा अर्थ असा की, बालकामगारांच्या आईवडीलांसारखेच त्यांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे उत्पन्न खूप कमी आहे. घरातील सर्व सदस्य काम करुन आर्थिक परिस्थिती सुधारत नाही हे स्पष्ट होते. म्हणून आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीकोनातून बालकामगारांनाही काम करावे लागत आहे.

### ६.११ बालक व बालिका कामगारांचे कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालकामगार प्रामुख्याने हॉटेल, उद्योग, बिडी उद्योग, घरकाम, बांधकाम क्षेत्र वगैरे क्षेत्रात काम करतात. त्यांचे काम करण्याचे स्वरुप कसे आहे. याबाबतचा आढावा घेणे महत्वाचे आहे. असे कोणते व्यवसाय उद्योग आहेत जेथे बालक व बालिका कामगारांना मोठी मागणी आहे. बिडी बनविणे व घरकामात बहूतांशी बालिका कामगार आढळल्या. प्रस्तूत अध्ययनात असे आढळले आहे की, बालक व बालिका कामगारांचे कामाचे स्वरुप देखिल निम्न दर्जाचे आहे. पुढील तक्ता क्र. ६.११ मध्ये बालक व बालिका कामगारांचे काम करण्याचे स्वरुपाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६.११**

**बालक व बालिका कामगारांचे कामाचे स्वरुपाचे विश्लेषण**

**Relationship between Nature of Child Labour Work and Gender of Child Labour**

| बालकामगारांचे कामाचे स्वरुप | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| कचरा वेचणे | उत्तरदात्यांची संख्या | ९ | २१ | ३० |
| | टक्केवारी | ३.५% | ८.१% | ११.५% |
| सिझनल काम | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.४% | ०.४% |
| वस्तु विकणे | उत्तरदात्यांची संख्या | २ | ० | २ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.०% | ०.८% |
| मजूरी | उत्तरदात्यांची संख्या | २ | ४ | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | ०.८% | १.५% | २.३% |
| सुतार | उत्तरदात्यांची संख्या | ० | ५ | ५ |
| | टक्केवारी | ०.०% | १.९% | १.९% |
| शेती | उत्तरदात्यांची संख्या | ४ | २ | ६ |
| | टक्केवारी | १.५% | ०.८% | २.३% |
| भंगार गोळा करणे | उत्तरदात्यांची संख्या | ० | ३ | ३ |
| | टक्केवारी | ०.०% | १.२% | १.२% |
| दोरी तयार करणे | उत्तरदात्यांची संख्या | १ | ४ | ५ |
| | टक्केवारी | ०.४% | १.५% | १.९% |
| खाटीक | उत्तरदात्यांची संख्या | ० | २ | २ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.८% | ०.८% |
| भेळ गाडी | उत्तरदात्यांची संख्या | ० | ५ | ५ |
| | टक्केवारी | ०.०% | १.९% | १.९% |
| पिठाची गिरणी | उत्तरदात्यांची संख्या | ० | २ | २ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.८% | ०.८% |
| बिडी बनविणे | उत्तरदात्यांची संख्या | ५० | १७ | ६७ |
| | टक्केवारी | १९.२% | ६.५% | २५.८% |
| दुध घरी नेऊन देणे | उत्तरदात्यांची संख्या | १ | १ | २ |
| | टक्केवारी | ०.४% | ०.४% | ०.८% |
| कपडे शिवणे | उत्तरदात्यांची संख्या | ३ | ० | ३ |
| | टक्केवारी | १.२% | ०.०% | १.२% |
| चायनिज गाडयांवर काम | उत्तरदात्यांची संख्या | १ | २२ | २३ |
| | टक्केवारी | ०.४% | ८.५% | ८.८% |
| घरकाम | उत्तरदात्यांची संख्या | ३६ | २ | ३८ |
| | टक्केवारी | १३.८% | ०.८% | १४.६% |
| विटभट्टी | उत्तरदात्यांची संख्या | ८ | १४ | २२ |
| | टक्केवारी | ३.१% | ५.४% | ८.५% |
| कारखान्यात | उत्तरदात्यांची संख्या | ० | ३ | ३ |
| | टक्केवारी | ०.०% | १.२% | १.२% |
| बिगारी | उत्तरदात्यांची संख्या | १ | १२ | १३ |
| | टक्केवारी | ०.४% | ४.६% | ५.०% |
| हॉटेल | उत्तरदात्यांची संख्या | १ | १८ | १९ |
| | टक्केवारी | ०.४% | ६.९% | ७.३% |
| गॅरेज | उत्तरदात्यांची संख्या | ० | ३ | ३ |
| | टक्केवारी | ०.०% | १.२% | १.२% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या कामाच्या स्वरुपाचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ६.११

## बालक व बालिका कामगारांच्या कामाच्या स्वरुपाचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ६.११ मध्ये बालक व बालिका कामगारांचे कामाच्या स्वरुपाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. ३.५% बालिका कामगार कचरा वेचण्याचे काम करतात तर ८.१% बालक कामगार कचरा वेचण्याचे काम करतात. ०.४% बालक कामगार सिझनल काम करतात. ०.८% बालिका कामगार वस्तू विकण्याचे काम करतात. ०.८% बालिका कामगार मजूरी करण्याचे काम करतात तर १.५% बालक कामगार मजूरी करण्याचे काम करतात. १.९% बालक कामगार सुताराचे काम करतात. १.५% बालिका कामगार शेतीमध्ये काम करतात तर ०.८% बालक कामगार शेतीमध्ये काम करतात. १.२% बालक कामगार भंगार गोळा करण्याचे काम करतात. ०.४% बालिका कामगार दोरी बनविण्याचे काम करतात तर १.५% बालक कामगार दोरी बनविण्याचे काम करतात. ०.८% बालक कामगार खाटीकाचे काम करतात. १.९% बालक कामगार भेळ गाडीवर काम करतात. ०.८% बालक कामगार पिठाच्या गिरणीत काम करतात. १९.२% बालिका कामगार बिडया बनविण्याचे काम करतात तर ६.५% बालक कामगार बिडया बनविण्याचे काम करतात. ०.४% बालिका

कामगार दुध घरी नेऊन देण्याचे काम करतात तर ०.४% बालक कामगार दुध घरी नेऊन देण्याचे काम करतात. १.२% बालिका कामगार कपडे शिवण्याचे काम करतात. ०.४% बालिका कामगार चायनिज गाडयावर काम करतात तर ८.५% बालक कामगार चायनिज गाडयांवर काम करतात. १३.८% बालिका कामगार घरकाम करतात तर ०.८% बालक कामगार घरकाम करतात. ३.१% बालिका कामगार विटभट्टीत काम करतात तर ५.४% बालक कामगार विटभट्टीत काम करतात. १.२% बालक कामगार कारखान्यात काम करतात. ०.४% बालिका कामगार बिगारी म्हणून काम करतात तर ४.६% बालक कामगार बिगारी म्हणून काम करतात. ०.४% बालिका कामगार हॉटेलमध्ये काम करतात तर ६.९% बालक कामगार हॉटेलमध्ये काम करतात. १.२% बालक कामगार गॅरेजमध्ये काम करतात. वरील विश्लेषणावरुन हे लक्षात येते की, सिझनल काम, सुतार, भंगार गोळा करणे, खाटीक म्हणून, भेळ गाडी, पिठाची गिरणी, कारखान्यात व गॅरेज मध्ये बालिका कामगार काम करताना आढळलेल्या नाहीत तर बालक कामगार वस्तू विकणे, कपडे शिवणे वगैरे कामात आढळलेले नाहीत. बिडया बनविणे व घरकाम करण्याच्या कामात बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर कचरा वेचणे, हॉटेल व चायनिज गाडयांवर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, बालक व बालिका कामगारांचे कामाचे स्वरुप अतिशय निम्न दर्जाचे आहे. बालकामगारांच्या घरातील गरीबी आणि दारिद्रय यामुळे मिळेल ते काम यांना करावे लागते ही चिंता करण्याची गंभिर बाब आहे. बिडया बनविणे, कचरा गोळा करणे, घरकाम करणे ही कामे आणि इतर कामे ही बालकांच्या वयाला झेपणारी काम नाही. यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. व कामाच्या ठिकाणी त्यांचे शोषणही होत असते. हि बाब या बालक व बालिकांच्या बालपणावर घातक परिणाम करीत असते.

## ६.१२ बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध) :

साधारणत: कामाचा आर्थिक मोबदला अर्थात मजूरी ही आठवडयाला किंवा महिन्याला मिळत असते. प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या बालक व बालिका कामगारांना कामाचा मोबदला कधी मिळतो या बाबींचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. अर्थात बालक व बालिका कामगारांना मिळणारी मजूरी किती दिवसांनी मिळते याबाबतचा सहसंबंधाचा तपशिल पुढील तक्ता क्र. ६.१२ मध्ये स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ६.१२

## बालक व बालिका कामगारांना वेतन मिळण्याचा कालावधीचे विश्लेषण

**Relationship between Duration of Wages of Child Labours and Gender of Child Labour**

| बालकामगारांना वेतन मिळण्याचा कालावधी | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| दररोज | उत्तरदात्यांची संख्या | १४ | ७७ | ९१ |
| | टक्केवारी | ६.३% | ३४.८% | ४१.२% |
| आठवडा | उत्तरदात्यांची संख्या | ५१ | ४८ | ९९ |
| | टक्केवारी | २३.१% | २१.७% | ४४.८% |
| दरमहा | उत्तरदात्यांची संख्या | २२ | ६ | २८ |
| | टक्केवारी | १०.०% | २.७% | १२.७% |
| प्रतिनग | उत्तरदात्यांची संख्या | १ | २ | ३ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.९% | १.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ८८ | १३३ | २२१ |
| | टक्केवारी | ३९.८% | ६०.२% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधीचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ६.१२

## बालक व बालिका कामगारांच्या वेतनाच्या कालावधीचे सहसंबंध



वरील तक्ता क्र. ६.१२ मध्ये बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधीचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३९.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ६०.२% आहे. दररोज वेतन मिळणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ६.३% आहे तर दररोज वेतन मिळणाऱ्या बालक कामगारांचे प्रमाण ३४.८% आहे. आठवडयाला वेतन मिळणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण २३.१% आहे तर आठवडयाला वेतन मिळणाऱ्या बालक कामगारांचे प्रमाण २१.७% आहे. दरमहा वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण १०.०% आहे तर दरमहा वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण २.७% आहे. प्रतिनग प्रमाणे वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण ०.५% आहे तर प्रतिनग प्रमाणे वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण ०.९% आहे. दररोज, दरमहा आणि प्रतिनगाप्रमाणे वेतन मिळणाऱ्या बालकामगारांमध्ये बालकांचे प्रमाण जास्त आहे तर आठवडयाला वेतन मिळणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिकांचे प्रमाण जास्त आहे.

### ६.१३ बालक व बालिका कामगारांना दररोज मिळणाऱ्या वेतनाचे प्रमाणाचे विश्लेषण (सहसंबंध) :

साधारणत: बालक व बालिका कामगारांना अतिशय  कमी मजूरी दिली जाते. बालक व बालिका कामगारांची हालाखिची परिस्थिती असल्यामुळे बालकामगार कमी वेतनावर काम करतात. बालक कामगारांच्या तुलनेने बालिका कामगारांना वेतन/मोबदला कमी मिळतो. बालक व बालिका कामगारांना मिळणाऱ्या वेतनाबाबत सहसंबंधाचा तपशिल पुढील तक्ता क्र. ६.१३ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६.१३**

**बालक व बालिका कामगारांना दररोज मिळणारे वेतनाचे विश्लेषण**

**Relationship between Rs. of Wages of Child Labours and Gender of Child Labour**

| बालकामगारांना दररोज मिळणारे वेतन | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| २० रु. पर्यंत | उत्तरदात्यांची संख्या | ३० | १३ | ४३ |
| | टक्केवारी | १३.६% | ५.९% | १९.५% |
| २१ ते ४० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ४० | ५६ | ९६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | १८.१% | २५.३% | ४३.४% |
| ४१ ते ६० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ११ | २२ | ३३ |
| | टक्केवारी | ५.०% | १०.०% | १४.९% |
| ६१ ते ८० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ४ | २२ | २६ |
| | टक्केवारी | १.८% | १०.०% | ११.८% |
| ८१ ते १०० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ० | १५ | १५ |
| | टक्केवारी | ०.०% | ६.८% | ६.८% |
| १०१ ते १२० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ० | २ | २ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.९% | ०.९% |
| १२१ ते १४० रु. | उत्तरदात्यांची संख्या | २ | १ | ३ |
| | टक्केवारी | ०.९% | ०.५% | १.४% |
| १४१ ते १६० रु. | उत्तरदात्यांची संख्या | १ | २ | ३ |
| | टक्केवारी | ०.५% | ०.९% | १.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ८८ | १३३ | २२१ |
| | टक्केवारी | ३९.८% | ६०.२% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांना दररोज मिळणाऱ्या वेतनाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.१३**

**बालक व बालिका कामगारांना दररोज मिळणाऱ्या वेतनाचे सहसंबंध**



वरील तक्ता क्र. ६.१३ मध्ये बालक व बालिका कामगारांना दररोज मिळणाऱ्या वेतनाचे प्रमाणाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३९.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ६०.२% आहे. दररोज २०रु. पर्यंत वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण १३.६%आहे तर दररोज रु. पर्यंत वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण ५.९%आहे. दररोज २०रु. पर्यंत वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण जास्त आहे तर दररोज २०रु. पर्यंत वेतन मिळणाऱ्या बालकांचे कमी प्रमाण आहे. दररोज २१ ते ४०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण १८.१%आहे तर दररोज २१ ते ४०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण २५.३%आहे. दररोज २१ ते ४०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण कमी आहे तर दररोज २१ ते ४०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आहे. दररोज ४१ ते ६०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण ५.०%आहे तर दररोज ४१ ते ६०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण १०.०%आहे. दररोज ४१ ते ६०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण कमी आहे तर दररोज ४१ ते ६०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आहे. दररोज ६१ ते ८०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण १.८%आहे तर दररोज ६१ ते ८० रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण १०.०%आहे. दररोज ६१ ते ८०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आहे तर बालिकांचे प्रमाण कमी आहे. दररोज ८१ ते १००रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण ६.८%आहे. दररोज ८१ ते १००रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण शुन्य आहे तर दररोज ८१ ते १००रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आहे. दररोज १०१ ते १२० रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण ०.०%आहे तर दररोज १०१ ते १२०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण ०.९%आहे. दररोज १०१ ते १२०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण शुन्य आहे तर दररोज १०१ ते १२०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे जास्त प्रमाण आहे. दररोज १२१ ते १४०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण ०.९%आहे तर दररोज १२१ ते १४०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण ०.५%आहे. दररोज १२१ ते १४०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण जास्त आहे तर दररोज १२१ ते १४०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण कमी आहे. दररोज १४१ ते १६०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे प्रमाण ०.५%आहे तर दररोज १४१ ते १६०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण ०.९%आहे. दररोज १४१ ते १६०रु. वेतन मिळणाऱ्या बालिकांचे कमी प्रमाण आहे तर दररोज

१४१ ते १६०रु. वेतन मिळणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आहे. एकंदरीत बालकामगारांना जो मोबदला किंवा वेतन मिळते ते खूपच कमी आहे. घरातील सर्व सदस्य काम करुन आणि बालक बालिका कामगारांनी काम करुनही त्यांची घरची आर्थिक परिस्थिती सुधारत असल्याचे दिसून येत नाही.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, बालक कामगारांपेक्षा बालिका कामगारांना मिळणारा मोबदला किंवा वेतन कमी आहे.

**Chi – Square Tests**

| Test | Value | df | Asymo.Sig (2 – Sided) |
|---|---|---|---|
| **Pearson Chi - Squre** | **35.491[a]** | **7** | **.000** |

**गृहीतके : बालकामगारांना मिळणारा मोबदला आणि बालकामगार मुलां – मुलींचे प्रमाण यांचासहसंबंध आहे.**

**$H_0$ = सहसंबंध नाही.**

**$H_1$ = सहसंबंध आहे.**

**स्पष्टीकरण :**

**सोलापूर शहरातील एकूण २६० बालकामगारांमध्ये १२० मुलींची संख्या आहे आणि १४० मुलांची संख्या आहे. परंतु बालकामगारामध्ये मुलां–मुलींची संख्या आणि त्यांना मिळणारा मोबदला यांचा काही सहसंबंध आहे का? हे पाहणे महत्वाचे वाटते. हे तपासून पाहण्यासाठी Chi – Square Testsचा वापर केला आहे. त्यामध्ये Level of Significanceहा ५% घेतला आहे, वरील गृहीतकासाठी Degree of freedom (df)हे ७ आहे. Level of Significance आणि df यांच्या साहाय्याने Chi – Square Tests ची Table Value ही १४.०६७ इतकी आहे. बालकामगारांच्या एकूण २६० प्रतिसादाच्या माध्यमातून प्राप्त झालेली Chi – Square Tests ची computed Test Value ही ३५.४९१ इतकी आहे. प्राप्त माहितीमध्ये computed Chi – Square Test Value ही Table Value पेक्षा अधिक असल्यामुळे गृहीतकातील $H_0$ आपण नाकारतो आणि $H_1$ चा स्विकार करतो. याचा अर्थ असा की, बालकामगारातील मुलांमुलींचे प्रमाण आणि त्यांना दिला जाणारा मोबदला यांचा जवळचा संबंध आहे. वयस्क कामगारांच्या तुलनेत बालकामगार मुलांमुलींना दिला जाणारा मोबदला कमी आहे. बालकामगार मुलांमुलींना दिला जाणारा मोबदला कमी असल्यास**

**बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण अधिक असते. याउलट त्यांना दिला जाणारा मोबदला जास्त असल्यास बालकामगार मुलांमुलींचे प्रमाण कमी दिसते. तक्त्यातील SignificanceLevel देखिल या सहसंबंधाला पुष्टी देतो. कारण त्यांची Value बरोबर .००० इतकी आहे.**

## ६.१४ बालक व बालिका कामगारांना अधिक काम केल्यामुळे मिळणारे वेतनाचे विश्लेषण (सहसंबंध) :

कोणत्याही क्षेत्रात, व्यवसायात किंवा उद्योगात कामगारांनी त्यांच्या नियमित कामाच्या व्यतिरिक्त जास्तीचे काम केले तर त्याला अतिरिक्त कामाचा मोबदला मिळणे आवश्यक आहे. तशा प्रकारची कायद्यात तरतुद आहे. प्रस्तुत पाहणीतील बहूतांशी बालक व बालिका कामगार कामाच्या ठिकाणी अनेकवेळा अतिरिक्त काम करतात. परंतू या बालक व बालिका कामगारांना अतिरिक्त कामाचा मोबदला मिळतो का?ज्या बालकामगारांना अधिकचे काम केल्यानंतर वेतन मिळते त्यामध्येही बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे. याबाबत सहसंबंधाचा तपशिल पुढील तक्ता क्र. ६.१४ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६.१४**

**बालक व बालिका कामगारांना अधिक काम केल्यामुळे मिळणारे वेतनाचे विश्लेषण**

**Relationship between Rs. of Over Time Works Wages and Gender of Child Labour**

| बालकामगारांना अधिक काम केल्यामुळे मिळणारे वेतन | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| अधिक तासांचे वेतन मिळत नाही | उत्तरदात्यांची संख्या | ८८ | ११३ | २०१ |
| | टक्केवारी | ३८.६% | ४९.६% | ८८.२% |
| २० रु. पर्यंत | उत्तरदात्यांची संख्या | ६ | १६ | २२ |
| | टक्केवारी | २.६% | ७.०% | ९.६% |
| २१ ते ४० रु. | उत्तरदात्यांची संख्या | १ | ४ | ५ |
| | टक्केवारी | ०.४% | १.८% | २.२% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | ९५ | १३३ | २२८ |
| | टक्केवारी | ४१.७% | ५८.३% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांना अधिकचे काम केल्यामुळे मिळणारे वेतनाचे सहसंबंध दर्शविले आहे.

### आलेख क्र. ६.१४

### बालक व बालिका कामगारांना अधिकचे काम केल्यामुळे मिळणारे वेतनाचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ६.१४ मध्ये बालक व बालिका कामगारांना अधिक काम केल्यामुळे मिळणारे वेतनाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४१.७% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५८.३% आहे. ३८.६% बालिका कामगारांना अधिक तास काम केल्यामुळे अधिकचे वेतन मिळत नाही तर ४९.६% बालक कामगारांना अधिक तास केल्यामुळे अधिकचे वेतन मिळत नाही. २.६% बालिका कामगारांना अधिक तास काम केल्यामुळे २० रु. इतके अधिकचे वेतन मिळते तर ७.०% बालक कामगारांना अधिक तास काम केल्यामुळे २० रु. इतके वेतन मिळते. अधिक तास काम केल्यामुळे २० रु. इतके अधिकचे वेतन मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे. अधिक तास काम केल्यामुळे २१ ते ४० रु. पर्यंत अधिकचे वेतन मिळणाऱ्या बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर अधिक तास काम केल्यामुळे २१ ते ४० रु. पर्यंत अधिकचे वेतन मिळणाऱ्या बालक कामगारांचे प्रमाण १.८% आहे. अधिकचे काम केल्यामुळे २१ ते ४० रु. पर्यंत अधिकचे वेतन मिळणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिकांचे प्रमाण कमी आहे. अधिकचे

काम करुनही अधिकचे वेतन मिळत नसणाऱ्या बालकामगारांची संख्या खूप जास्त आहे. येथे बालिका व बालकांचे आर्थिक शोषण होत असतानाचे दिसते.

वरील विश्लेषणावरुन असे निदर्शनास येते की, ज्या बालकामगारांना अधिकचे काम केल्यानंतर वेतन मिळते त्यामध्येही बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे. याचा अर्थ बालिका कामगारांना कमी मोबदला मिळतो व त्यांचे आर्थिक शोषण सुद्धा होत आहे.

## ६.१५ बालक व बालिका बालकामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचे विश्लेषण (सहसंबंध) :

बहूतांशी बालक व बालिका कामगारांना मजूरी केल्यामुळे त्या मजूरीचा मोबदला मालक वर्गाकडून मिळतो. परंतू असे काही बालक व बालिका कामगार आहेत ज्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळत नाही. कारण ते आपल्या आईवडीलांना, पालकांना मदत करतात. ते मदत करीत असल्यामुळे त्यांना थेट मोबदला मिळत नाही. त्यामुळे बालक व बालिका कामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचा सहसंबंध अभ्यासणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ६.१५ मध्ये हि बाब स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ६.१५**

**बालक व बालिका कामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचे विश्लेषण**

**Relationship between Sources of Income of Child Labour and Gender of Child Labour**

| बालकामगाराचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| मालक | उत्तरदात्यांची संख्या | ८३ | १२८ | २११ |
| | टक्केवारी | ३१.९% | ४९.२% | ८१.२% |
| पालक | उत्तरदात्यांची संख्या | २५ | ५ | ३० |
| | टक्केवारी | ९.६% | १.९% | ११.५% |
| आई | उत्तरदात्यांची संख्या | ८ | ३ | ११ |
| | टक्केवारी | ३.१% | १.२% | ४.२% |
| वडील | उत्तरदात्यांची संख्या | २ | ४ | ६ |
| | टक्केवारी | ०.८% | १.५% | २.३% |
| इतर | उत्तरदात्यांची संख्या | २ | ० | २ |
| | टक्केवारी | ०.८% | ०.०% | ०.८% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये  बालक व बालिका कामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.१५**

**बालक व बालिका कामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.१५ मध्ये बालक व बालिका कामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोताचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. मालकांकडून वेतन मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३१.९% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ४९.२% आहे. मालकांकडून वेतन मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. पालकांकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ९.६% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.९% आहे. पालकांकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. आईकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ३.१% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.२% आहे. आईकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण कमी आहे. वडीलांकडून आर्थिक

सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.५% आहे. वडीलांकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. इतरांकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.८% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ०.०% आहे. इतरांकडून आर्थिक सहाय्यता मिळणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगारांचे प्रमाण शुन्य आहे.

### ६.१६ बालक व बालिका कामगारांचे स्वत:वरचे खर्चाचे विश्लेषण (सहसंबंध) :

बालक व बालिका कामगार स्वत: पैसे कमवित असल्यामुळे इतक्या लहान वयात हातात पैसा मिळत असल्याने तो पैसा स्वत:वर खर्च करण्याचा विचार करतात. काही बालक व बालिका कामगार असे आहेत जे स्वत:वर पैसा खर्च करीत नाही सर्व पैसा घरात देतात. प्रस्तुत पाहणीत किती बालक व बालिका कामगार स्वत:वर पैसे खर्च करतात आणि किती खर्च करत नाहीत ते पुढील तक्ता क्र. ६.१६ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६.१६**

**बालक व बालिका कामगारांचा स्वत:वरचा खर्चाचे विश्लेषण**

**Relationship between Own Expenditure of Child Labour and Gender of Child Labour**

| बालकामगारांचा स्वत:वरचा खर्च | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| खर्च करत नाही | उत्तरदात्यांची संख्या | ५६ | १७ | ७३ |
| | टक्केवारी | २१.५% | ६.५% | २८.१% |
| १० रु. पर्यंत | उत्तरदात्यांची संख्या | ५६ | ७६ | १३२ |
| | टक्केवारी | २१.५% | २९.२% | ५०.८% |
| ११ ते २० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ७ | ३६ | ४३ |
| | टक्केवारी | २.७% | १३.८% | १६.५% |
| २१ ते ३० रु. | उत्तरदात्यांची संख्या | १ | ६ | ७ |
| | टक्केवारी | ०.४% | २.३% | २.७% |
| ३१ ते ४० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ० | ५ | ५ |
| | टक्केवारी | ०.०% | १.९% | १.९% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगारांच्या स्वत:वरचे खर्चाचे सहसंबंध दर्शविले आहे.

**आलेख क्र. ६.१६**

**बालक व बालिका कामगारांचे स्वत:वरचे खर्चाचे सहसंबंध**




वरील तक्ता क्र. ६.१६ मध्ये बालक व बालिका कामगारांचे स्वत:वरचे खर्चाचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. २१.५% बालिका कामगार स्वत:वर पैसा खर्च करत नाहीत तर ६.५% बालक कामगार स्वत:वर पैसे खर्च करत नाहीत. म्हणजेच स्वत:वर पैसे खर्च करत नसल्यामध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे तर मुलांचे प्रमाण कमी आहे. त्याचप्रमाणे १० रु. पर्यंत खर्च करण्यामध्ये बालिकांचे प्रमाण २१.५% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण २९.२% आहे. म्हणजेच १० रु. पर्यंत खर्च करण्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ११ ते २० रु. पर्यंत स्वत:वर पैसे करणाऱ्यामध्ये बालिका कामगारांचे प्रमाण २.७% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १३.८% आहे. म्हणजेच ११ ते २० रु. स्वत:वर पैसे खर्च करणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. २१ त ३० रु. स्वत:वर पैसे खर्च करणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.४% आहे तर

बालक कामगारांचे प्रमाण २.३% आहे. म्हणजेच २१ ते ३० रु. स्वत:वर पैसे खर्च करणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे तर बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ३१ ते ४० रु. स्वत:वर पैसे खर्च करणाऱ्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ०.०% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण १.९% आहे. म्हणजेच स्वत:वर ३१ ते ४० रु. खर्च करणाऱ्या बालकामगारामध्ये बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालिका कामगारांचे प्रमाण शुन्य आहे.

वरील विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, स्वत: पैसे खर्च करत नसलेल्या बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालक कामगाराचे प्रमाण कमी आहे. त्याचप्रमाणे स्वत:वर पैसे करणाऱ्या बालकामगारांमध्ये बालक कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर बालिका कामगारांचे प्रमाण कमी आहे. याचा अर्थ मुलांना रोज खर्चाला पैसे हवेत म्हणून हे बालक काम करतात त्याचप्रमाणे अशा पद्धतीने रोज ते स्वत:वर पैसे खर्च करत असतील तर जे ते कमवत आहेत त्यापैकी घरामध्ये किती देत असतील. म्हणजेच बालकामगार स्वत: काम करुन त्यांच्या कुटूंबाच्या उत्पन्नात भर पडत नाही. ही बाब अत्यंत गंभिर व चिंताजनक आहे.

## ६.१७ बालक व बालिका बालकामगार बचत करतात किंवा नाही याबाबत विश्लेषण (सहसंबंध) :

पैशाची बचत करणे हे आर्थिक दृष्टीकोनातून अत्यंत चांगली सवय आहे. कारण भविष्यातील कोणत्याही आकस्मिक खर्चासाठी याचा उपयोग केला जाऊ शकतो. त्यामुळे पैशाच्या बचतीस अत्यंत महत्व आहे. सदरील पाहणीतील बालक व बालिका कामगार स्वत: पैसे कमवतात. त्यामुळे ते पैशाची बचत करतात का? हे संशोधनात्मकदृष्टया अभ्यासणे आवश्यक आहे. पुढील तक्ता. क्र. ६.१७ मध्ये किती बालक व बालिका कामगार बचत करतात आणि किती नाही याचा सहसंबंध स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ६.१७

## बालक व बालिका कामगार बचत करतात किंवा नाही याबाबतचे विश्लेषण

**Relationship between Saving  and Gender of Child Labour**

| बालकामगार  बचत करतात किंवा नाही | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| बचत करतात | उत्तरदात्यांची संख्या | ० | ६ | ६ |
| | टक्केवारी | ०.०% | २.३% | २.३% |
| बचत करत नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १३४ | २५४ |
| | टक्केवारी | ४६.२% | ५१.५% | ९७.७% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगार बचत करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ६.१७

## बालक व बालिका कामगार बचत करतात किंवा नाही याबाबतचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ६.१७ मध्ये बालक व बालिका बालकामगार बचत करतात किंवा नाही याबाबत विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका

कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. २.३% बालक कामगार बचत करतात. ४६.२% बालिका कामगार बचत करीत नाहीत तर ५१.५% बालक कामगार बचत करत नाहीत. याचा अर्थ बालिका कामगारांकडून काहीही बचत होत नाही तर बालक कामगारांकडून फक्त २.३% बालक कामगाराच बचत करतात. याचा अर्थ काम केलेला सर्व पैसा खर्च केला जातो.

## ६.१८ बालक व बालिका कामगार किती बचत करतात याचे विश्लेषण (सहसंबंध) :

प्रस्तुत पाहतील किती बालक व बालिका कामगार बचत करतात आणि किती बालक व बालिका कामगार बचत करीत नाही हे पाहिल्यानंतर जे बालक व बालिका कामगार बचत करतात त्याचे प्रमाण किती आहे ते पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ६.१८ मध्ये बालक व बालिका कामगारांद्वारा केली जाणारी बचतीची पातळीचे सहसंबंध स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ६.१८

### बालक व बालिका कामगार किती बचत करतात याचे विश्लेषण

**Relationship between Saving amount of Child Labour and Gender of Child Labour**

| बालकामगार किती बचत करतात | | लिंग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | बालिका | बालक | |
| बचत करत नाहीत | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १३४ | २५४ |
| | टक्केवारी | ४६.२% | ५१.५% | ९७.७% |
| १० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ० | २ | २ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.८% | ०.८% |
| २० रु. | उत्तरदात्यांची संख्या | ० | ३ | ३ |
| | टक्केवारी | ०.०% | १.२% | १.२% |
| २० रु. च्या अधिक | उत्तरदात्यांची संख्या | ० | १ | १ |
| | टक्केवारी | ०.०% | ०.४% | ०.४% |
| एकूण | उत्तरदात्यांची संख्या | १२० | १४० | २६० |
| | टक्केवारी | ४६.२% | ५३.८% | १००.०% |

पुढील आलेखामध्ये बालक व बालिका कामगार किती बचत करतात याबाबतचे सहसंबंध दर्शविले आहे.

## आलेख क्र. ६.१८

### बालक व बालिका कामगार किती बचत करतात याबाबतचे सहसंबंध




वरील तक्ता क्र. ६.१८ मध्ये बालक व बालिका कामगार किती बचत करतात याचे विश्लेषण (सहसंबंध) दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये बालिका कामगारांचे प्रमाण ४६.२% आहे तर बालक कामगारांचे प्रमाण ५३.८% आहे. जे २.३% बालक कामगार बचत करतात त्यापैकी ०.८% बालक कामगार १० रु. पर्यंतची बचत करतात. १.२% बालक कामगार २० रु. ची बचत करतात. त्याचप्रमाणे २० रु. पेक्षा जास्त बचत करणाऱ्या बालक कामगारांचे प्रमाण ०.४% आहे. याचा अर्थ बालिका कामगारांकडून काहीच बचत केली जात नाही तर अगदी कमी बालक कामगारांकडून बचत केली जाते.